**(आरोपी जिल्हा मध्यवर्ती कारागृह, परभणी येथून दुरचित्रवाणीव्दारे हजर)**

सरतपासणी सरकारपक्षातर्फे **साक्षीदार क्र.१४**

मी याव्दारे शपथपूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | **विश्वनाथ मेसाजी वाव्हळ,** |
| वय | – | ६० वर्षे, |
| व्यवसाय | – | मजूरी, |
| राहणार | – | बोरी, ता. जिंतूर, जि. परभणी. |

**<u>सरतपास सरकारपक्षातर्फे श्री. डी.यु. दराडे, सरकारी वकील</u>**

०१) मयत जयश्री माझी मुलगी होती. घटनेच्यावेळी ती नवव्या वर्गामध्ये ज्ञानोपासक शाळा, बोरी येथे शिकत होती. मी आरोपीला ओळखतो. आरोपी हा भोगलगाव येथील रहिवाशी आहे. रोहित व जयश्रीचे लग्न वर्ष २०२१ मध्ये मी लावून दिले होते. लग्नानंतर रोहित व जयश्री हे रोहितच्या गावी काही महिने राहिले व नंतर आमच्याकडे राहण्यासाठी आले. आमच्या घरी ते दोन्ही एक ते दोन महिने राहिले, त्यानंतर ते औरंगाबाद येथे गेले. ते औरंगाबाद येथे किरायाने राहत होते व त्यांचे संबंध चांगले होते. वर्ष २०२३ मध्ये मी त्या दोघांना बोरी येथे आणले होते. मी जयश्रीला शाळेमध्ये प्रवेश करून दिला. माझी मुलगी जेंव्हा शाळेमध्ये जात होती त्यावेळेस रोहित (आरोपी) हा आमच्या घरी राहत होता.

०२) दिनांक १८.०१.२०२४ रोजी जयश्री ही शाळेमध्ये गेली. मला तिचा अपघात झाल्याबाबत माहिती मिळाली. आम्ही परभणी येथील शासकीय रूग्णालयात पोहोचलो. मी जयश्रीचे मृत शरीर पाहिले. मी

दवाखान्यात असतांना पोलीसांनी माझे कोऱ्या कागदावर सह्या घेतल्या होत्या. मी बोरी पोलीस स्टेशन येथे गेलो त्याठिकाणी, फिर्याद दिली. मला आता फिर्याद दाखविली, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूराबाबत मला माहित नाही. सदरहू फिर्यादला ओळख म्हणून **नि.क्र.११८/पी.डब्ल्यू.१४** देण्यात आला. (सदरच्या कागदपत्रास नियमाप्रमाणे सिध्द करण्याच्या अटीवर निशाणी क्रमांक देण्यात येत आहे). मला नमुना प्राथमिक खबर दाखविली, त्यावर माझी सुध्दा सही आहे. त्यातील मजकूराबाबत मला माहित नाही. नमुना प्राथमिक खबरला ओळख म्हणून **नि.क्र.११९/पी.डब्ल्यू.१४** देण्यात आला. (सदरच्या कागदपत्रास नियमाप्रमाणे सिध्द करण्याच्या अटीवर निशाणी क्रमांक देण्यात येत आहे).

०३) जयश्री व रोहित आमच्या घरी आणल्यानंतर त्यांचे संबंध चांगले होते.

साक्षीदार सहकार्य करत नसल्याने अभियोक्ता यांनी त्याला कलम १५७ भारतीय साक्ष अधिनियम प्रमाणे प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.

**उलटतपास सरकार पक्षातर्फे श्री. डी.यु. दराडे, सरकारी वकील**

०४) हे म्हणणे खरे नाही की जयश्री व रोहित औरंगाबाद येथे राहत असतांना रोहित जयश्रीवर संशय घेवून तिला मारहाण करत होता. जयश्री ही माझी पहिली पत्नी धुरपता हिच्यापासून मुलगी आहे. हे म्हणणे खरे आहे की ललिता विश्वनाथ वाव्हळ ही माझी दुसरी पत्नी आहे व ती देवळाई चौक, औरंगाबाद येथे राहते. हे म्हणणे खरे आहे की ललिताने जयश्री व रोहितला खोली करून दिली होती. औरंगाबाद येथे जयश्री ही ललिताकडे ८ ते १५

दिवसांनी जायची. हे मला माहित नाही की जयश्रीने ललिताला रोहितपासून तिला त्रास असल्याचे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की जयश्रीने मला फोन करून रोहितकडून त्रास असल्याचे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की त्या कारणास्तव मी फक्त जयश्रीला औरंगाबाद येथून आणून बोरी येथील शाळेमध्ये टाकले होते. हे म्हणणे खरे नाही की त्यानंतर रोहित सुध्दा बोरी येथे आला व त्याने माझी माफी मागितली. हे म्हणणे खरे नाही की वर्ष २०२३ च्या दिवाळीच्या सणानंतर जयश्रीला रोहितकडे पाठविले होते, त्यावेळेस ती रोहितकडे ५ ते ६ दिवस राहिली होती. हे म्हणणे खरे नाही की त्यानंतर, जयश्रीने मला फोन करून रोहित त्रास देत आहे असे कळविले म्हणून, मी जयश्रीला आमच्या गावी घेवून आलो.

०५) हे म्हणणे खरे नाही की घटनेनंतर आरोपीचे आई–वडिल मला भेटले होते. हे म्हणणे खरे नाही की त्या लोकांनी रोहितला माफ करा अशी विनंती केली व त्याबद्दल मला ते रक्कम देतील असे प्रस्तावित केले. हे म्हणणे खरे नाही की रोहितच्या आई–वडिलांच्या सांगण्यावरून आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की माझे जिंतूर येथील न्यायाधीशासमोर बयान नोंदविले होते. साक्षीदार स्वतःहून सांगतो की सदरहू बयान काय द्यायचे याबाबत मला पोलीसांनी सांगितले होते. मला आता बयान दाखविले, त्यावर माझी सही आहे. सदरहू बयानास **नि.क्र.१२०/पी.डब्ल्यू.१४** देण्यात आला.

## <u>उलटतपास आरोपीतर्फे श्री. एस.आर. भुतडा, वकील</u>

०६) हे म्हणणे खरे आहे की घटनेबद्दल माहिती मिळाली त्यावेळेस मी व आरोपी घरीच होतो. हे म्हणणे खरे आहे की मी व आरोपी हे

*०३.०७.२०२६*
*सत्र न्यायाधीश, परभणी*

घटनास्थळी सोबत गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळापासून मी परभणी येथे गेलो व पोलीसांनी आरोपीला सोबत नेले. हे म्हणणे खरे आहे की सकाळी ०७.३० वाजताच्या दरम्यान मी घटनास्थळी पोहोचलो होतो.

फेरतपास नाही.

वा.दा.ब.अ.क.केले. श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा./-

(आर.एम.सादराणी)

दिनांक – ०३.०७.२०२६ सत्र न्यायाधीश, परभणी.

*०३.०७.२०२६*
*सत्र न्यायाधीश, परभणी*